# अल्पवयीन मुलीवर दुष्कर्म; माजी उपसरपंचास अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे दि.३१ जुलै रोजी ०३.३० वा. आरोपीच्या राहत्या घरी अल्पवयीन मुलीला मजुरीच्या पैसे देतो असे सांगून वळसंग येथील पत्राच्या खोलीमध्ये नेऊन अल्पवयीन मुलीवर आरोपी दत्ता राठोड रा. वळसंग तालुका दक्षिण सोलापूर यांनी बळजबरीने शारीरिक संबंध करून सदर बाबत कोणाला सांगितल्यास तुझे आई-वडिलांना जिवे मारतो असे धमकी दिले. अल्पवयीन निर्भया यांनी आई-वडिलांना सांगितल्यानंतर दि.०१ ऑगस्ट रोजी वळसंग पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी वळसंग गावचे माजी उपसरपंच असून लैंगिक अत्याचाराचे प्रकरण झाल्यानंतर फरार झाला होता. फरार आरोपी दत्ता राठोड यास ०७ ऑगस्ट रोजी सहायक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले यांनी अटक केले. अक्कलकोट उपविभागीय अधिकारी विलास यामावार त्यांनी आरोपीला न्यायालयात हजर करण्यात यशस्वी झाले. पोलिस पीडित तरुणीला न्याय देण्यास धडपड करत आहे. आरोपीस दि.१३ ऑगस्टपर्यंत पोलीस कस्टडीत चौकशी करण्यास न्यायालयाने आदेश दिले आहेत.

# नवी पेठेत अतिक्रमणावर कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १० ऑगस्ट -**

अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज गुरुवारी विजापूर रोड, नवी पेठसह विविध तीन ठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम राबविली. नवी पेठ येथील दुकानांसमोरील अनधिकृतपणे टाकलेल्या पत्र्यांचे फ्रंट मार्जिन जेसीबीच्या साह्याने काढण्यात आले.

गुरुवारी महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाईचा मोर्चा गजबजलेल्या नवी पेठ बाजारपेठेकडे वळविला. नवी पेठेतील नामदेव चिवडा समोर रस्त्यावरच गजरे विकणाऱ्यांचे स्टॉल्स आढळून आले. हे गजऱ्याचे दहा स्टॉल्स पथकाने जप्त केले. नवी पेठ मधील दुकानांसमोरील ५ ते १० फूट पत्र्याचे फ्रंट मार्जिन जेसीबीच्या साह्याने काढण्यात आले. विजय देशमुख नगरात एका इसमाने सार्वजनिक रोडवर अतिक्रमण करून मोठे गेट लावले होते. हे गेट जप्त केले. विजापूर रोड रहदारीस अडथळा ठरेल अशाप्रकारे मासे विक्री करणाऱ्यांवरही कारवाई केली. कारवाई टाळण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

## सिव्हीलमधून डॉक्टराची दुचाकी चोरीस

**सोलापूर :** येथील सिव्हिल हॉस्पिटलच्या बी ब्लॉक समोर डॉक्टर तरूणीने लावलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना दि. ७ ऑगस्ट रोजी घडली. डॉ.श्रुतिका शंकर भोईर (वय २४, रा. टेमघर पाडा, कल्याण रोड ता.भिवंडी, जि.ठाणे पूर्व सध्या पी जी रेसिडन्ट लेडिज हॉस्टेल रूम नं.६, सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर) ही सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटल मध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असून तिची एम एच ०४ एस सी ३७२३ या नंबरची होंडा ॲक्टीवा मोटारसायकल बी ब्लॉक समोर पार्क केलेली असताना अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली.

## जाहीर नोटीस

क्रि.कि.अर्ज नं. २०२/२०२३
नि.नं.०५

**माळशिरस येथील मे.ज्युडी मॅजि.वर्ग-१ यांचे न्यायालयात**

**श्री. गजानन ज्ञानेश्वर श्रीखंडे** - **अर्जदार**
**विरुध्द**
**मे.ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत फोंडशिरस** - **सामनेवाला**
ता.माळशिरस, जि.सोलापूर

तमाम लोकांना विशेषतः मौजे फोंडशिरस व परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांच्या आई कै.निर्मला ज्ञानेश्वर श्रीखंडे हे ता.२४/०८/२००० रोजी मौजे फोंडशिरस ता.माळशिरस येथे राहत्या घरी मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यूची नोंद मे.ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत फोंडशिरस ता.माळशिरस येथे मृत्यू रजिष्टरला केलेली नाही.

यातील अर्जदार यांच्या आई कै.निर्मला ज्ञानेश्वर श्रीखंडे यांच्या मृत्यूची नोंद मे.ग्रामविकास अधिकारी फोंडशिरस यांच्याकडे मृत्यू नोंद रजिष्टरला करण्याबाबत तसा त्यांना आदेश व्हावा म्हणून अर्जदार यांनी अर्ज दाखल केला आहे. सबब अर्जदार यांच्या आई कै.निर्मला ज्ञानेश्वर श्रीखंडे यांच्या मृत्यूच्या नोंदीस कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली पुढील ता. तशी लेखी पुराव्यासह मे.कोर्टात म्हणणे दाखल करुन हरकत घ्यावी. तसेच मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार न आल्यास अर्जदार यांच्या मागणीप्रमाणे मे.कोर्ट पुढील कारवाई करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिले असे ता. २५/०५/२०२३

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
फौजदारी न्यायालय
माळशिरस

## मध्य रेल्वे

**सोलापूर विभाग**

**ई-निविदा सूचना क्रमांक**
**35-2023-DENC**
**तारीखः 09.08.2023**

DRM(W)'s, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामासाठी नामांकित फर्म/कॉन्ट्रॅक्टरकडून ई-निविदा मागवतात. कामाचे नावः १) दोन वर्षांसाठी DEN/PVR अंतर्गत रेल्वे क्वार्टर आणि सर्व्हिस बिल्डिंगसाठी देखभाल आणि देखभाल क्रियाकलाप. २) दोन वर्षांसाठी DEN/PVR अंतर्गत रेल्वे क्वार्टर आणि सर्व्हिस बिल्डिंगसाठी देखभाल आणि देखभाल क्रियाकलापांसाठी साहित्याचा पुरवठा. कामाची अंदाजे किंमतः रु. 2,03,30,288.25/- बयाणा पैसेः रु. 251700.00/- काम पूर्ण होण्याचा कालावधीः 24 (चोवीस) महिने देखभाल कालावधीः शून्य महिने निविदा फॉर्मची किंमतः शून्य तारीख आणि www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची वेळः 30.08.2023 15.00 तास. www.ireps.gov.in da 30.08.2023 15.30 तासांनंतर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ. वेबसाइट तपशीलः www.ireps.gov.in टीपः संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांनी या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुध्दीकरण लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट द्यावीः www.ireps.gov.in

**डीआरएम (वर्क्स)**
**मध्य रेल्वे, सोलापूर**

Apex-074

रेलमदाद हेल्पलाइन १३९

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि. कि. अर्ज नं. २४८/२०२३

**अक्कलकोट येथील मे.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी सो. यांचे कोर्टात**

**कलावती उत्तम गायकवाड** - **अर्जदार**
रा. संभाजी नगर नं. २, रमाबाई आंबेडकर नगर,
जे. व्ही. लिंक रोड, पोवई, साकिनाका, मुंबई
**विरुध्द**
**ग्रामपंचायत बणजगोळ, ता. अक्कलकोट** - **सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात क्रि. कि. अर्ज नं. २४८/२०२३ हा जन्म मृत्यू अधिनियम कलम १३ (३) अन्वये अर्जदाराची आई तुकाबाई गुरान्ना मुन्नोरे ही दि. ०७/०७/२०२२ रोजी तिच्या राहत्या घरी म्हणजे बणजगोळ, ता. अक्कलकोट येथे मयत झाली असून तिच्या मृत्यूची नोंद सामनेवाला यांच्या मृत्यू नोंदणी दप्तरी होऊन तसा मृत्यू दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या नोटीसीने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा अर्जदाराची आई तुकाबाई गुरान्ना मुन्नोरे हिच्या मृत्यू अथवा मृत्यू तारखेबाबत कोणाची काही हरकत असल्यास अथवा उक्त अर्जाच्या पृष्टर्थ अथवा विरूध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दि. २७/०९/२०२३ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदाराची आई तुकाबाई गुरान्ना मुन्नोरे हिच्या मृत्यू तारखेची नोंद होण्याचा आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे प्रसिध्दीकरण केले. ता.१०/०८/२०२३

**आज रोजी मे. कोर्टाच्या हुकुमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले.**

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी
न्यायालय, अक्कलकोट

## जाहीर प्रसिद्धीकरण

**दि. कि. अर्ज नं. ६३/२०२३ नि.नं. ०५**
पुढील नेमलेली तारीख २९/०८/२०२३

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

१) **दत्तात्रय मुरलीधर जाधव,** वय ६२ वर्षे, धंदा- शेती, रा. कळंबवाडी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **पोपट मुरलीधर जाधव,** वय ५८ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
३) **अशोक मुरलीधर जाधव,** वय ५० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
४) **वच्छला अंबादास पाटील,** वय ६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. गुळपोळी, ता. बार्शी, जि. सोलापूर
५) **सिताबाई जनार्दन सुर्वे,** वय ५५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वाणेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
६) **महानंदा आगतराव जाधव,** वय ५३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. वाणेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
७) **सचिन आगतराव जाधव,** वय ३२ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
८) **योगेश आगतराव जाधव,** वय ३० वर्षे, धंदा- शेती, रा. सदर

**अर्जदार**

**- विरुद्ध -**
**कोणी नाही** **सा. वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ हे सख्खे भाऊ असून अर्जदार नं. ४ व ५ या त्यांच्या बहिणी आहेत तर अर्जदार नं. ६ ही त्यांचे मयत भाऊ आगतराव मुरलीधर जाधव यांची पत्नी व अर्जदार नं. ७, ८ हे मयत आगतराव मुरलीधर जाधव यांची मुले आहेत. अर्जदार नं. १ ते ५ व मयत आगतराव यांची आई फुलाबाई उर्फ पद्मीनी मुरलीधर जाधव या दि. २०/०६/२०२१ रोजी मौजे कळंबवाडी (पा), ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिशकाणी मयत झालेल्या आहेत. त्यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना न्यायालयीन कामाकरीता तसेच अन्यही कायदेशीर कारणाकरीता वारस प्रमाणपत्राची गरज भासली असे कथन करुन अर्जदारांनी हेशरशिप प्रमाणपत्र मागणीचा अर्ज केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविणेत येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनासंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असल्यास संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे अथवा पुढील नेमलेली तारीख २८/०८/२०२३ रोजी मे. कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही तक्रारी, हरकती न आलेस प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : ०५/०८/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**क्रि. कि. अर्ज नं. ३५४/२०२३**
पुढील नेमलेली तारीख १२/०९/२०२३

**बार्शी येथील मे. ज्युडि. मॅजि. वर्ग-१ साहेब यांचे कोर्टात**

**सुहास मोहन लोहार,** वय ३४ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अर्जदार

**- विरुद्ध -**

**मा. आरोग्याधिकारी/मा. निबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी,** बार्शी नगरपरिषद, बार्शी, बार्शी, जि. सोलापूर — सा. वाला

Á¶mAWu, यातील अर्जदार यांची आई सुशिला मोहन लोहार यांचा मृत्यू दिनांक १९/०४/२०१६ रोजी भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी येथे वृद्धाकाळाने मृत्यू झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सा.वाला बार्शी नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टरला झालेली नसल्याने सदरचा अर्ज अर्जदाराने आई सुशिला मोहन लोहार यांचा मृत्यू दिनांक १९/०४/२०१६ रोजी भवानी पेठ, बार्शी, ता. बार्शी येथे झाला असल्याने तशी नोंद सा.वाला बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला करणेबाबत व तसा दाखला अर्जदारास देणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत यासाठी हा अर्ज आणलेला आहे.

Ë¶mAWu, या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेल्या तारीख १२/०९/२०२३ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : ०९/०८/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

## जाहीर प्रसिद्धीकरण

**क्रि. कि. अर्ज नं. ३९३/२०२३**
पुढील नेमलेली तारीख २९/०९/२०२३

**बार्शी येथील मे. ज्युडि. मॅजि. (वर्ग-१) साहेब यांचे कोर्टात**

**भाऊसाहेब गौतम कांबळे,** वय ५५ वर्षे, धंदा- शेती,
रा. पिंपळगांव (धस), ता. बार्शी, जि. सोलापूर — अर्जदार

**- विरुद्ध -**

**मा. ग्रामसेवक, ग्रामपंचायत पिंपळगांव (धस),**
ता. बार्शी, जि. सोलापूर (याचे नोटीस/समन्स मा. ग्रामसेवक, पिंपळगांव (धस) यांचेवर बजवावे.) — सा. वाला

Á¶mAWu, सदरकामीअर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवाशी असून अर्जदार याच्या मुलाचा जन्म लक्ष्मण भाऊसाहेब कांबळे याचा दि. ०१/१०/२००४ रोजी मौजे पिंपळगांव (धस), ता. बार्शी येथे अर्जदार याचे राहते घरी झालेला होता व आहे. त्यानंतर अर्जदाराचा मुलगा लक्ष्मण भाऊसाहेब कांबळे याच्या जन्माची नोंद रीतसर सा.वाला ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिस्टरला करावी. परंतु अर्जदार व त्यांचे कुटुंबातील व्यक्तीचे दुर्लक्ष व अडाणीपणामुळे सदर जन्माची नोंद संबंधित सा.वाला ग्रा.पं. पिंपळगांव (धस) यांचे जन्म मृत्यू रजिस्टरला झालेली नाही. अर्जदार याने त्याचा मुलगा लक्ष्मण भाऊसाहेब कांबळे याच्या दि. ०१/१०/२००४ रोजी जन्माची नोंद मौजे पिंपळगांव (धस) ग्रामपंचायत जन्म मृत्यू रेकॉर्डला आढळून आलेली नाही म्हणून सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

Ë¶mAWu या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदाराचे अर्जातील मागणी व विधानासंबंधाने जर कोणाचेही आक्षेप असल्यास संबंधितांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमलेल्या तारीख २९/०९/२०२३ रोजी पर्यंत मे. कोर्टात स्वतः अगर आपल्या विधीज्ञामार्फत हजर होवून आपले तक्रारी, हरकती लेखी स्वरुपात सादर कराव्यात अन्यथा मुदतीनंतर मे. कोर्टाचे पुढील हुकूम होतील. हे प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : १०/०८/२०२३

सही/-
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
फौजदारी न्यायालय, बार्शी
ता. बार्शी, जि. सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका नविन हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १०३/२/३/१ यासी नविन सर्व्हे नं. १०१/२/अ/१ पैकी राजेश कोठे नगर या रो-हाऊस बंगला पैकी रो-हाऊस ब्लॉक नं. ३० यासी एकुण क्षेत्र ६८.६६ चौ. मीटर यावरील तळमजला व पहिला मजला मिळून एकुण सुपर बिल्टअप क्षेत्र ६५.०० चौ. मीटर इतकी आहे. यासी चतुःसीमा :-

पुर्वेस :- रस्ता, पश्चिमेस :- रो-हाऊस ब्लॉक नं.२४
दक्षिणेस :- रो-हाऊस ब्लॉक नं.३१, उत्तरेस :- ब्लॉक नं. २९

येणेप्रमाणे चतुःसीमेतील रो-हाऊस, त्यावरील बांधकाम व त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही मिळकत श्री. मल्लिकार्जून धानप्पा गोरंटी, रा. २०६/१७, हेरिटेज मणिधारी एम्पायर, अ. कोट रोड, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे, त्यांनी ही मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे, तरीही वर नमूद मिळकत, रो-हाऊस संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. दि.१०/०८/२०२३

**सही/-**
**अशिलातर्फे**
**ॲड. आर. डी. श्रीराम**
ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर
मो.नं. ९८८१२४०५१६,

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मोजे बाशी परिसरातील तसेच वाशी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापुर सब डि. व ता. वाशी पैको मौजे. बाशी येथील म्युनिसिपल हद्दीतील मिळकती :-

अ) सि.स. नं. ४३६२ यापैकी दक्षिण बाजूकडील क्षेत्र २४०.६४ चौ.मी. याच चौ. फुट २५९० यासी चतु:सिमा पुर्वस. सि.स.नं. ३८९३/२, दक्षिणेस-सि.स.नं. ३८९१ मधील लोंढे यांची जागा, पश्चिमेस सोलापुर रस्ता व उत्तरेस ६.१० मी. रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक पश्चिम व उत्तर बाजुचे रस्त्याने जाते व आहे.

ब) सि.स.नं. ३८९३/२ यापैकी दक्षिण-पश्चिम कोपन्यातील खुली जागा क्षेत्र ८२.३१ चौ.मी. याचे चौ. फुट ८८५.९५ यासी चतु:सिमा पूर्वेस- सि.स.नं. ३८९३/२, दक्षिणेस.. सव्हे नं. ६० मधील सोमाणी मिलची जागा, पश्चिमेस- सि.स.नं. ४३६२ व उत्तरेस - ६.१० मो. रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक उत्तर बाजूचे रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः समापुर्वक मिळकती आतील सर्व तदंगभुत वस्तु व वहिवाटीच्या हक्कांसह वरील वर्णन केलेली मिळकत ही अर्जित हिरालाल नहार व महावीर अजित नहार दोघे रा. बालाजी कॉलनी सोलापुर रोड, बार्शी यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकीची व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची असुन सदर मिळकतीच्या हक्कपत्रकी त्यांचे नावे असुन त्यांनी सदर मिळकत ही त्यांचे कौटुंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुश खरेदी देण्याचा ठराव करुन इसारा दाखल रोख रक्कम घेतली आहे व सदर जागा खरेदी देण्याचा व्यवहार ठरलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे.

तरीही वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकत ही निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वईच्छेने सोडुन दिला असे समजुन आमचे अशिल ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहून कोणतीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे. ता. १०/०८/२०२३

**सही/-**
**ॲड सोहम एन. मनगिरे**
पत्ता- स्वामी कृपा, शिवाजीनगर,
अलिपुर रोड, बार्शी, ता. बार्शी जि.
सोलापुर मो. ८६२४८८३२८८
**खरेदी घेणार अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## दुष्कर्मप्रकरणी वकीलासह नऊ जणांना अटक

**मोहोळ, दि. १० ऑगस्ट -**

रेशन दुकानला निघालेल्या अल्पवयीन मुलीला जवळ बोलावून तिच्याशी अश्लिल करत तिला उसात ओढत नेण्याचा प्रयत्न करित असताना हाताला हिसका देवून पळून गेली पुढील अनर्थ टळला परंतु नंतर त्या मुलीस व आत्यास येवून नऊ जणांनी मारहाण केली ही घटना मोहोळ तालुक्यात घडली याबाबत वकीलासह नऊ जणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

अल्पवयीन पीडित मुलगी १० ऑगस्ट रोजी रेशन दुकानात धान्य आणण्यासाठी जात होती . त्या रोडवर ज्ञानेश्वर येडगे या वकीलांचे घर आहे. फिर्यादी महिला पाठीमागून रेशनचे सामान आणण्यासाठी जात असताना पीडित मुलगी रडत घराकडे येत असल्याचे दिसले. तिचे अंगावरील कपडे फाटलेले होते. तिला विचारले असता सांगितले की ज्ञानेश्वर येडगे याने तिच्या हाताला पकडून धरून ओढून जवळ घेवून तिचे अंगावरील कपडे फाडून, तिच्याशी अश्लील चाळे करत ऊसात ओढून नेत असताना पिडीतेने हाताला हिसका देऊन पळून आली. दरम्यान वकील ज्ञानेश्वर येडगे व नातेवाईक तिथे आले. त्यांनी फिर्यादीस, पीडित मुलीला मारहाण केली. तसेच येडगे याच्या पत्नीने फिर्यादी महिलेच्या गळयातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून नेले अशा आशयाची फिर्याद दिली असून त्यानुसार पोलिसांनी वकिल ज्ञानेश्वर येडगे, याच्यावर बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गुन्हा दाखल केला असून अन्य ८ जणांच्या विरोधात मारहाण केल्याचा गुन्हा दाखल केला. अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

# लवाद न्यायाधिकरण

**(लवाद - ॲड. श्रीशैल एम. हवनाळे, बी.ए.एल.एल.बी)**

**एकल लवाद न्यायालय**

**लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि., सोलापूर**

प्लॉट नं. ९४/६६, मित्र नगर, रब्बी रिसर्च सेंटरचे मागे, शेळगी, सोलापूर - ४१३००६

## जाहिर प्रकटन जिल्हा - सोलापूर

या जाहीर नोटीसीने खाली दिलेल्य रिस्पॉन्डेंन्टस यांना कळविण्यात येते की, दावेदार **लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटी लि. सोलापूर** या संस्थेने खाली नमुद कर्जदार, जामीनदारांविरुध्द थकीत कर्जाची वसुली ॲवार्ड मिळणेकामी लवाद न्यायालयाकडे दावे दाखल केले असून, कर्जदार जामीनदार यांनी दिलेल्या अधिकृत, नोंद पत्त्यावर लवाद न्यायालयाकडून पाठविलेल्या (आर.पी.ए.डी.ने) लवाद दाव्याचे नोटीस रजिस्टर पोस्ट न बजावता परत आले आहे.

न्यायाच्या दृष्टीने संबंधित कर्जदार व जामिनदारांना योग्य संधी देऊन न्याय निवाडा करणेकामी ही जाहीर नोटीस प्रसिध्दीस दिली आहे. खालील नमूद रिस्पॉन्डेंन्टस यांनी पुढील निर्देशित तारखेपूर्वी अथवा दि. ०९/०९/२०२३ या तारखेस वर नमूद पत्त्यावर लवाद न्यायालयासमोर उपस्थित राहून लेखी म्हणणे न मांडल्यास एकतर्फी न्यायनिवाडा करण्याचे सुचित करत आहे.

| अ.क्र | लवाद दावा क्र व दिनांक | नाव | | शाखा | पत्ताा | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | लवाद दावा क्र. ०१/२०२३ | १. श्रीमंत भिमशा सपकाळ | कर्जदार | शेळगी | मु. पो धुळखेड, ता. इंडी जि. विजापूर | १,६१,५१६/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २.श्रीमंत शिवशंकर कोळी | जामिनदार | | मु. पो मुडेवाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | |
| | | ३. दिलीप अर्जुन माळी | जामिनदार | | मु. पो मुडेवाडी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. सोलापूर (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 2 | लवाद दावा क्र. ०२/२०२३ | १. च्द्रकांत बसप्पा पुजारी | कर्जदार | शेळगी | मु.पो लच्याण ता. इंडी जि. विजापूर . | २,१३,१८६ |
| | दि. १४/०१/२०२३ | २.बसप्पा चंद्राम पुजारी | जामिनदार | | मु.पो लच्याण ता. इंडी जि. विजापूर. | |
| | | ३ .काशिनाथ बसण्णा चौगुले | जामिनदार | | मु.पो लोणी ता. इंडी जि. विजापूर. | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. सोलापूर (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 3 | लवाद दावा क्र. ०३/२०२३ | १. चंद्रकांत बसप्पा पुजारी | कर्जदार | शेळगी | मु.पो लच्याण ता. इंडी जि. विजापूर | २,६०,१५६/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २ .महादेव धर्मण्णा हळळी | | | मु.पो लोणी ता. इंडी जि. विजापूर | |
| | | ३.बसप्पा चंद्राम पुजारी | | | मु.पो लच्याण ता. इंडी जि. विजापूर | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. सोलापूर (व्ही.पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 4 | लवाद दावा क्र. ०४/२०२३ | १. संतोष कुमार मेक्कण्णा | कर्जदार | शेळगी | मु.पो. इंगळगी ता. शहापूर जि. यादगिरी | १,८५,३५७ |
| | दि. १४/०१/२०२३ | २. हनुमंत परप्पा गाडद | जामिनदार | | मु.पो. मणियार ता.. सिंदगी जि. विजयपूर | |
| | | ३. भागम्मा कुमार मेकण्णा | जामिनदार | | मु.पो. इंगळगी ता. शहापूर जि. यादगिरी | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. तडवळ (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 5 | लवाद दावा क्र. ०५/२०२३ | १. श्रीशैल बसप्पा रोडगी | कर्जदार | शेळगी | मु..पो हिक्कनगुटटी, विजापूर ता. सिंदगी जि. कर्नाटक | ३,७०,५७८/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २. मलनगौड रामचंद्र पाटील | जामिनदार | | मु.पो.हि-याळ ता. अफजलपूर | |
| | | ३. हणमंत परप्पा गाडद | जामिनदार | | मु.पो. गणीहार ता. सिंदगी जि. कर्नाटक | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. तडवळ (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 6 | लवाद दावा क्र. ०६/२०२३ | १.संजिवकुमार लोमण्णा करोती | कर्जदार | शेळगी | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | ५,१५,८७०/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २. अंबण्णा पिरप्पा वाई | जामिनदार | | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | |
| | | ३. तिपण्णा गुरुबाळ करोती | जामिनदार | | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. सोलापूर (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 7 | लवाद दावा क्र. ०८/२०२३ | १. तिपण्णा गुरुबाळ करुटी | कर्जदार | शेळगी | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | २,२९,०११/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २. संजीवकुमार लोमण्णा करुटी | जामिनदार | | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | |
| | | ३. वाई सायबण्णा अंबण्णा | जामिनदार | | मु.पो. मणूर ता. अफजलपूर जि. गुलबर्गा | |
| | | ४. गोकुल माऊली सुगर्स लि. सोलापूर (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 8 | लवाद दावा क्र. १०/२०२३ | १. हनुमंत परप्पा गाडद | कर्जदार | शेळगी | मु.पो.गणीहार ता. सिंदगी जि. विजापूर | १,१७,११४/- |
| | दि. १४/०१/२०२३ | २. मलनगौड रामचंद्र पाटील | जामिनदार | | मु.पो. हि-याळ ता. अफजलपूर | |
| | | ३. श्रीशैल बसप्पा रोडगी | जामिनदार | | मु. पो. हिक्कनगुत्ती ता. सिंदगी जि. कर्नाटक | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. तडवळ (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |
| 9 | लवाद दावा क्र. ०९/२०२३ | १. प्रकाश गेनु चव्हाण | कर्जदार | शेळगी | मु.पो. इंदिरानगर तांडा, हंगरगा नळ, ता.तुळजापूर जि. उस्मानाबाद. | ४,८०,२९६ |
| | दि. १४/०१/२०२३ | २. गेमा बदू चव्हाण | जामिनदार | | मु.पो. इंदिरानगर तांडा, हंगरगा नळ, ता.तुळजापूर जि. उस्मानाबाद. | |
| | | ३. काशिनाथ बाबूराव बिराजदार | जामिनदार | | मु.पो.वडगांव ता.द.सोलापूर जि. सोलापूर | |
| | | ४. गोकुल माऊली शुगर्स लि. तडवळ (व्ही. पी. शुगर्स लि.) | जामिनदार | | पहिला मजला, सिध्द कस्तुरी चेंबर्स, मंत्री चंडक विहार मागे, ईस्सार पेट्रोल पंपाजवळ, होटगी रोड, सोलापूर | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस प्रसिध्द केली. ता. ०९/०८/२०२३

**सही/-**
**लवाद अधिकारी**
**(एस.एस. हवनाळे)**

# PRECISION CAMSHAFTS LIMITED

Regd. Office : E-102/103 MIDC, Akkalkot Road, Solapur, MH 413006
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of unaudited Consolidated Financial Results for the quarter ended June 30, 2023 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in Lakhs, except Earnings per share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended June 30, 2023 (Unaudited) | Year ended March 31, 2023 (Audited) | Quarter ended March 31, 2023 (Audited) |
| 1. | **Revenue From Operations** | **26,277.04** | **108,014.49** | **27,857.11** |
| 2. | Profit / (Loss) Before Exceptional Item & Tax | 872.82 | 6,027.80 | 1,131.20 |
| 3. | Profit / (Loss) Before Tax | 872.82 | 6,027.80 | 1,131.20 |
| 4. | Profit / (Loss) for the Period / Year | 410.92 | 4,628.59 | 1,110.94 |
| 5. | Total Comprehensive Income / (Loss) for the period/year, net of tax | 447.92 | 4,536.67 | 1,082.97 |
| 6. | Paid up Equity Share Capital Equity Share of 10/- each | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Other Equity excluding Revaluation Reserve | - | - | - |
| 8. | Earnings per share (of Rs.10/- each) | | | |
| | Basic : | 0.43 | 4.87 | 1.17 |
| | Diluted : | 0.43 | 4.87 | 1.17 |

**Notes:**

1. The above financial results for the quarter ended June 30, 2023 have been subjected to limited review by the statutory auditors of the Group and reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Holding Company at the meeting held on August 10, 2023.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the audited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website (**www.bseindia.com** and **www.nseindia.com**) and also on the Company's website - **www.pclindia.in**
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Key Standalone Financial information

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended June 30, 2023 (Unaudited) | Year ended March 31, 2023 (Audited) | Quarter ended March 31, 2023 (Audited) |
| 1. | **Revenue from Operations** | **17,089.16** | **62,634.38** | **16,880.03** |
| 2. | Profit / (Loss) Before Exceptional Item and Tax | 2,484.01 | 8,341.06 | 1,986.62 |
| 3. | Profit / (Loss) Before Tax | 2,484.01 | 8,341.06 | 1,986.62 |
| 4. | Profit / (Loss) for the period | 1,963.39 | 6,094.82 | 1,403.80 |
| 5. | Total Comprehensive Income / (Loss) for the period/year, net of tax | 1,965.61 | 6,108.40 | 1,391.89 |

Place : Pune
Date : August 10, 2023

For and on behalf of the Board of Directors
Sd/-
Ravindra R. Joshi
Whole-time Director & CFO